महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्ग
(गट-क) कर्मचाऱ्यांच्या बदल्या

## नगरपरिषद प्रशासन संचालनालय

७ वा मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी, बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

क्र.नपप्रसं-२०२५/कक्ष-३/संवर्ग-कर्म/बदली/5694

दिनांक - 29 JUL 2025

वाचा:

१. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम , २००५
२. महाराष्ट्र नगरपरिषद/ नगरपंचायती, औद्योगिक नगरे राज्यसेवा (समावेशन, सेवाप्रवेश व सेवाशर्ती) नियम, २००६ (सुधारणासह)
३. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: एमसीओ२०१७/प्र क्र ११९/नवि-१४ दि ११-०५-२०१७
४. संचालनालयाचे पदोन्नती आदेश दि २२-०४-२०२५, बदली आदेश दि ३०-०५-२०२५
५. संचालनालयाचे पत्र क्र ४६६३ दि १६-०६-२०२५ व क्र ५०२६ दि ०१-०७-२०२५
६. अवर सचिव (नवि १४) नगर विकास विभाग यांचे पत्र दि २३-०७-२०२५

## सुधारित आदेश

उपरोक्त वाचा क्र ३ मधील नगरविकास विभागाचे दि ११ मे २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र नगरपरिषद राज्यसेवा संवर्गातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या बदल्या करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना घोषित करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५, मधील तरतुदीनुसार उपरोक्त वाचा क्र ४ दि ३०-०५-२०२५ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय (गट-क ) संवर्ग कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत.

वाचा क्र १ मधील तरतूदीनुसार करावयाच्या अंशतः बदलाबाबत वाचा क्र ५ अन्वये लगतचे वरिष्ठ प्राधिकारी म्हणून मा प्रधान सचिव, नवि २ यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने वाचा क्र ६ च्या पत्रान्वये सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे.

प्राप्त मान्यतेनुसार खालील कर्मचारी यांना पदस्थापना दिलेल्या ठिकाणी अंशतः बदल करून त्यांचे नावासमोरील रकाना क्र ७ मध्ये दर्शविलेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतीमध्ये सुधारित पदस्थापना करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग व श्रेणी | बदलीपूर्व कार्यरत नगरपरिषद / नगरपंचायत | बदली झालेला आदेश क्रमांक व दिनांक | स्तंभ क्र ६ अन्वये बदली दिलेले ठिकाण | सुधारित पदस्थापना दिलेली नगरपरिषद/ नगरपंचायत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मालधुरे विनय रमेशराव | संगणक अभियंता श्रेणी क | वरुड जि अमरावती | ४२७२ दि ३०-०५-२०२५ | मोवाड जि नागपूर | शेंदुर्जनाघाट जि अमरावती |
| २ | विजय धोंडीबा गाडेकर | लेखापाल व लेखापरीक्षक श्रेणी अ | संगमनेर जि अहिल्यानगर | ३३४५ दि २२-०४-२०२५ | भुसावळ जि जळगाव | श्रीरामपूर जि अहिल्यानगर |
| ३ | तनवीर अबिदसो जमादार | लेखापाल व लेखापरीक्षक श्रेणी अ | विटा जि सांगली | ३३४५ दि २२-०४-२०२५ | परळी वैजनाथ जि बीड | धाराशिव जि धाराशिव |
| ४ | अमित रमेश खंडेलवाल | लेखापाल व लेखापरीक्षक श्रेणी अ | गोंदिया जि गोंदिया | ३३४५ दि २२-०४-२०२५ | भंडारा जि भंडारा | गोंदिया जि गोंदिया |

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | संवर्ग व श्रेणी | बदलीपूर्व कार्यरत नगरपरिषद / नगरपंचायत | बदली झालेला आदेश क्रमांक व दिनांक | स्तंभ क्र ६ अन्वये बदली दिलेले ठिकाण | सुधारित पदस्थापना दिलेली नगरपरिषद/ नगरपंचायत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ५ | प्रमोद शंकर वानखडे | लेखापाल व लेखापरीक्षक श्रेणी ब | अचलपूर जि अमरावती | ३३४६ दि २२-०४-२०२५ | वणी जि यवतमाळ | वरुड जि अमरावती |
| ६ | तुकाराम दिनकर जोशी | लेखापाल व लेखापरीक्षक श्रेणी ब | तीर्थपुरी जि जालना | ३३४६ दि २२-०४-२०२५ | उदगीर जि लातूर | जिंतूर जि परभणी |
| ७ | हर्षदा हिरामण राजपूत | कर निर्धारक व प्रशासकीय अधिकारी श्रेणी ब | चांदवड जि नाशिक | ४२४८ दि ३०-०५-२०२५ | जामनेर जि जळगाव | नांदगाव जि नाशिक |
| ८ | अजीमउल्ला वलीउल्ला मोहम्मद | कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी श्रेणी क | मुदखेड जि नांदेड | ४२४८ दि ३०-०५-२०२५ | पूर्णा जि परभणी | कंधार जि नांदेड |
| ९ | रमेश सूर्यभान राठोड | कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी श्रेणी ब | इगतपुरी जि नाशिक | ४२४२ दि ३०-०५-२०२५ | येवला जि नाशिक | आदेश क्र ४२४२ दि ३०-०५-२०२५ नुसार येवला जि नाशिक येथील बदली रद्द आणि इगतपुरी जि नाशिक येथील पदस्थापना कायम |
| १० | प्रदिपकुमार जनार्दन बोरगे | पाणीपुरवठा अभियंता श्रेणी क | कुरुंदवाड जि कोल्हापूर | ४२४७ दि ३०-०५-२०२५ | महाबळेश्वर जि सातारा | सांगोला जि सोलापूर |
| ११ | निरज प्रकाश नाफडे | पाणीपुरवठा अभियंता श्रेणी ब | नांदुरा जि बुलढाणा | ४२४७ दि ३०-०५-२०२५ | बाळापुर जि अकोला | खामगाव जि बुलढाणा |
| १२ | प्रसाद शरदकुमार पाटील | पाणीपुरवठा अभियंता श्रेणी क | मलकापूर जि सातारा | ४२३९ दि ३०-०५-२०२५ | हुपरी जि कोल्हापूर | आदेश क्र ४२३९ दि ३०-०५-२०२५ नुसार हुपरी जि कोल्हापूर येथील बदली रद्द आणि मलकापूर जि सातारा येथील पदस्थापना कायम |

१. उक्त अधिकारी/कर्मचारी यांना सध्याच्या कार्यरत पदावरुन दि २१- ०७ -२०२५ रोजी (म.नं) पासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. मुख्याधिकारी यांनी रिक्त राहणाऱ्या पदाचा अतिरिक्त कार्यभार संवर्गातील इतर कर्मचाऱ्यास देण्यात यावा.

२. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी पदस्थापना दिलेल्या नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये दि ३०-०७- २०२५ रोजी रुजू होऊन तसा आपला अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा. तसेच मुख्याधिकारी यांनीही अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

३. संबंधित अधिकारी / कर्मचारी हे कार्यमुक्त झाल्यानंतर पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न झाल्यास व परस्पर रजेवर गेल्यास ती रजा अनधिकृत समजण्यात येवून संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

४. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे बदलीनंतरचे वेतन व भत्ते बदलीने पदस्थापना होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायतीमधून काढण्यात यावेत. तसेच संबंधित कर्मचाऱ्याचे अंतिम वेतन प्रमाणपत्र तात्काळ देण्यात यावे.

५. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची विशेष बाब म्हणून बदली केलेली असल्याने त्यांना बदलीप्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

६. बदली आदेशान्वये केलेली पदस्थापना रद्द करणे, त्यात बदल करणे यासाठी कोणत्याही प्रकारचे दडपण / दबाव आणू नये. तसे केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम २३ नुसार शिस्तभंगाची कारवाई होऊ शकेल याची संबधित कर्मचाऱ्याने नोंद घ्यावी.

(अभिषेक कृष्णा भा प्र से)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

**प्रत:**

१. मा प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव
२. उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, नवि-१४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३. संबंधित सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय
४. संबंधित मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
५. संबंधित कर्मचारी